
धक्का!! सुराज्य सोलापूर
मंगळवार, दि.१९ मार्च २०२४ । पान १२



# उमेदवारीचं धक्कातंत्र





✔ सोलापूर/प्रतिनिधी

**भारतीय जनता पक्षाच्या नेत्यांनी एकाचवेळी अनेक इच्छुकांना काम सुरु करण्याचे संकेत दिले आहेत. त्यामुळे केवळ इच्छुकच नव्हे तर मतदार ही गोंधळून गेले आहेत. भाजपचे या नेमक्या धक्कातंत्राचा 'सुराज्य'ने घेतलेला मागोवा...**

## उद्दिष्टपूर्ती आणि उमेदवारी



भारतीय जनता पक्षाचा महाराष्ट्रातून ४५ पेक्षा अधिक उमेदवार या लोकसभा निवडणुकीत विजयी करायचे आहेत. प्रत्येक मतदार संघाचा पक्ष निरिक्षक रा.स्व संघ यांच्या प्रतिनिधींकडून मगवलेला अहवाल यांसह त्रयस्थ संस्थांकडून करून घेतलेले सर्वेक्षण यांच्या आधारावर उमेदवारी निश्चित केली जाणार आहे. जर विरोधक प्रबळ असतील तर त्यांना पक्षा घेऊन त्यांचा उचित सन्मान करत विरोधाची धार बोथट करण्याचा प्रयत्न पक्षाकडून केला जात आहे. या साऱ्या मागे महाराष्ट्रातून गेल्या निवडणुकीपेक्षा अधिक जागा निवडून आणण्याचे उद्दिष्ट असल्याचे पक्षाच्या प्रदेश नेतृत्वातील सूत्रांने सांगितले.

## 'तो' डाटा अन् जानकराचं उमेदवारीचं स्वप्न

सोलापूर लोकसभेची उमेदवारी आपणास देऊ, असे आश्वासन देणाऱ्या भाजपा श्रेष्ठींनी जानकर यांना या मतदार संघामधील पाच हजार लोकांचे सर्व्हेक्षण करून तसा अहवाल आणण्याबद्दल सांगितले. जानकरांची आपल्या माळशिरस तालुक्यातील ५०० मुलांची फौज या मतदार संघात फिरविली. केलेल्या सर्व्हेक्षणात तब्बल ९८ टक्के नागरिकांचे समर्थन आपल्याला आहे, असा अहवाल तयार करून जानकर यांनी उमेदवारीचं मोठं स्वप्न रंगवत प्रदेश भाजपा कार्यालयाकडे सादर केला. या अहवालाबद्दल जानकरांनी या कार्यालयाकडे विचारणा केली तेव्हा केंद्राच्या पार्लमेंटरी बोर्डाकडे दिल्याचे सांगण्यात आले.

## साबळे म्हणताहेत...सगळं शिजलंय

अमर साबळे यांच्याकडे सोलापूर लोकसभेच्या उमदेवारीबद्दल विचारणा केली जाते तेव्हा आपलं सगळं शिजलंय. पार्लमेंटरी बोर्डाच्या कोर्टात आपल्या उमेदवारीचा चेंडू आहे. भाजप आणि मित्रपक्षांचा जागा वाटपाचा मुद्दा निकलात निघताच उमेदवारांची तिसरी यादी घोषित होईल. त्या यादीत आपले नाव निश्चित असेल. पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखाली इंडिया शायनिंग म्हणून देश पुढे गेला.पण सत्ता असतानाही केवळ विद्यमान खासदाराच्या इच्छाशक्तीअभावी विकासाच्याबाबीत दहा वर्षे सोलापूर मागे गेले. ती कसर आपण भरून काढूया, असं ते आत्मविश्वासानं सांगतात.

## जानकरांचा 'उत्तम' नादखुळा

अमर साबळे यांच्या नंतर माळशिरसचे राष्ट्रवादीचे नेते उत्तम जानकर यांनादेखील सोलापूर लोकसभेच्या उमेदवारीचा नाद लावला. हा नाद लावल्यानंतर जानकर हेदेखील अजित पवार यांच्या राष्ट्रवादीच्या गोटातून पुन्हा स्वगृही भाजपात डेरेदाखल होण्याला राजी झाले. सोलापूर लोकसभेच्या उमदेवारीचा गूळ त्यांच्या कोपराला लावला गेला. तेव्हा आपण भाजपाशी कसे पहिल्यापासून जुडले गेलेले होतो? हे सांगितले. आपला जन्मच या पक्षामधील असल्याचे सांगत त्यांनी निष्ठेवर प्रश्नचिन्ह आणणाऱ्यांची बोलती बंद केली.

## उमेदवारी 'रामभरोसे' तरीपण सातपुतेंसाठी आखाडा



आरक्षण प्रवर्गातील जात प्रमाणपत्र आणि आमदार प्रणिती शिंदे यांना फाईट देऊ शकेल असा युवा चेहरा म्हणून माळशिरसचे आमदार राम सातपुते यांचं कार्ड सोलापूर लोकसभेसाठी पुढं करण्यात आलं. उमेदवारीबद्दल ते स्वत:हून इच्छुक आहेत, असा प्रस्ताव उमेदवार निवडीच्या पार्लमेंटरी बोर्डापुढे नसला तरी सोलापूर लोकसभा सर्वात प्रबळ दावेदार म्हणून सातपुते यांचे नाव पुढे करण्यात आले. आमदार सातपुते यांच्याबाबतीत एवढा कहर झाला की आमदार राम सातपुते विरुद्ध आमदार प्रणिती शिंदे असा 'फाईट टू फाईट' सामना रंगणार असं चित्र कालपासून प्रचंड प्रमाणात रंगविण्यात आलं. विशेषत्वे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी राम सातपुते यांना बीड जिल्ह्यातून आणून माळशिरसचे आमदार बनविण्याचा 'करिष्मा' घडविला. तेच फडणवीस सातपुते यांना सोलापूरचे खासदार बनविणार अशी पुस्ती जोडत त्यांच्या उमेदवारीची प्रचंड चर्चा घडविली. जेव्हा उमेदवारीची यादी पार्लमेंट बोर्डाकडून घोषित होईल, तेव्हा खरं बिग फुटेल. पण आमदार सातपुते यांच्यासाठीसुद्धा भाजपाने पत्ता फेकला हे उघड होते.

## साबळेंच्या कोपराला दुसऱ्यांदा गूळ

अमर साबळे यांच्या नावाचा पत्ता तसं तर भाजपानं दुसऱ्यांदा फेकला. मागच्या लोकसभेवेळी त्यांना सोलापूरच्या उमेदवारीचा नाद लावला होताच. यंदाही लोकसभेच्या तयारीला लागा असं सांगतानाच साबळे कामाला लागले. त्यांनी आपला सोलापुरातील मुक्काम वाढविला. होटगी रस्त्यावरील आ.सुभाष देशमुख यांच्या बंगल्यावर ये-जा वाढविली. विजयकुमार देशमुख यांच्या संपर्क कार्यालयात चकराही मारल्या. सोलापुरातील भाजपामधील सर्वच पदाधिकाऱ्यांच्या गाठीभेट घेत त्यांच्या नेटवर्कमध्ये आपल्या उमेदवारीच्या महत्त्वाकांक्षेचं सिमकार्ड अधिक पॉवरफुल्ल ठेवलं.



## सागर बंगल्यावर अवतरले साबळे

आरक्षित सोलापूर लोकसभेची निवडणूक लढविण्याची प्रबळ इच्छा असलेले अमर साबळे हे सोमवारी मुंबई येथील उपमुख्यमंत्र्याच्या सागर या निवासस्थानी अवतरले. तिथे त्यांनी फडणवीस यांच्यासोबत चाय पे चर्चा करत सोलापूर लोकसभेच्या जागेवर उमेदवारी देण्याची मागणी केली. फडणवीस यांच्या सोबत त्यांची साधारण १५ मिनिटे चर्चा झाली. संघटनात्मक कामाचा रिपोर्ट त्यांनी साबळे यांच्याकडून ऐकून घेतला.

## जानकरांच्या मुंबई-दिल्ली वाऱ्या अन् गाठीभेटींची दमछाक



'तयारीला लागा' या दोन शब्दांच्या श्रेष्ठींच्या आश्वासनांची भुरळ पडलेल्या उत्तम जानकर यांनी उमेदवारीच्या पार्श्वभूमीवर, श्रेष्ठींकडे लॉबिंग करण्यासाठी मुंबई-दिल्ली चकरा मारल्या. मतदार संघामध्ये उत्तम जानकर हे नाव चर्चेत येऊ द्या, पक्षाच्या सर्व संबंधितांची भेट घ्या, अशा सूचना त्यांना श्रेष्ठींनी दिल्या होत्या. त्यावर जानकर यांनी सोलापूर लोकसभा मतदार संघातील सर्व आजी-माजी आमदार, पक्षाचे प्रमुख पदाधिकारी, नेते, पुढारी यांच्या घरांच्या आणि संपर्क कार्यालयांचे उंबरठे झिजविले. उमेदवार म्हणून सहकार्य करा, हे हात जोडून सांगता सांगता त्यांचे शेवटी हात दुखले. मुंबई-दिल्ली वाऱ्या, सर्व्हेक्षण, गाठीभेटी यामध्ये जानकरांची अक्षरश:: दमछाक होताना दिसली.

# मोहिते-पाटलांचा तिढा चर्चेतून सुटणार?



**मोहिते-पाटील गटाशी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस चर्चा करणार आहे. याशिवाय केंद्रीय नेतृत्वाशी त्यांची चर्चा घडवून आणण्यात येणार आहे. या दोन्ही पातळीवरील चर्चेतून मोहिते-पाटील कुटुंबियांचा असणारा विरोध मावळेल, अशी अपेक्षा भारतीय जनता पक्षाच्या शिर्षस्थ नेतृत्वाला आहे. त्याचवेळी मोहिते-पाटील परिवाराकडून वापराण्यात येणाऱ्या दबाव तंत्राविषयी नाराजी व्यक्त होत आहे.**

### आमदार राम सातपुते काय म्हणाले

- लोकप्रिय खासदार नाईक-निंबाळकर यांच्या पाठिशी आम्ही सर्व आमदार पूर्ण ताकदीने आहोत उभे
- या निवडणुकीत भाजपाचे कमळ चिन्हा हाच आहे उमेदवार
- पंतप्रधान मोदी, गृहमंत्री शहा हे उमदेवार या सर्वांच्या पाठीमागे माढ्याची जनता आहे उभी
- राम मंदिर, ३०७ असेल हे सगळे प्रधानमंत्री मोदी यांनीच केले
- माढ्यात 'कमळ' फुलवण्यासाठी सर्वजण झटतील
- मोहिते-पाटील यांच्याशी देवेंद्र फडणवीस चर्चा करतील त्याला यश येईल
- माळशिरसमधून भाजपाच्या उमदेवारीला गतवेळेसारखे लीड मिळेल
- पक्ष जी जबाबदारी देईल ती जबाबदारी पार पाडणार

लोकसभा निवडणूकीचे बिगुल वाजले असून सर्वच पक्षांच्या गाठी भेटी व मतदारसंघातील नेते मंडळीची बैठका होत आहेत. या पार्श्वभूमीवर, माढा लोकसभा मतदारसंघातील महायुतीची बैठक करमाळ्याचे आमदार संजयमामा शिंदे यांच्या फार्म हाऊसवर पार पडली. यावेळी पत्रकार परिषदेमध्ये खासदार रणजितसिंह निंबाळकर यांनी माढा मतदारसंघात भाजपा विरोधात तुल्यबळ उमेदवार नाही असे प्रतिपादन केले. तसेच विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या नाराजीवर वरिष्ठ पातळीवर मन धरणी सुरू असून चर्चेअंती प्रश्न मार्गी लागेल अशी शाश्वती दिली.

यावेळी आ. बबनराव शिंदे यांनी बोलताना म्हटले की, माढा मतदारसंघात महायुतीची वज्रमुठ कायम राहणार असून महायुतीतील सर्वच नेते एकजुटीने काम करणार आहेत. यावेळी माण- खटाव चे आमदार जयकुमार गोरे यांनी गतवर्षीच्यापेक्षा अधिकचे मताधिक्य निंबाळकर यांना देण्यासाठी कार्यकर्ते कामाला लागले आहेत अशी ग्वाही दिली. माळशिरस तालुक्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी व देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून विकासकामांच्या पाठबळावर जनता भरघोस मतदान महायुतीच्या उमेदवारला देणार असल्याचे आ. राम सातपुते यांनी सांगितले.



# दबावतंत्र न झुगारण्याची भापजाची रणनिति

**विद्यमान खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांना देण्यात आलेली उमदेवारी रद्द करण्यात यावी, यासाठी अकलूजकर मोहिते-पाटील समर्थकांनी काल शंकरनगर येथील शिवरत्न बंगल्यावर प्रचंड राडा घातला. यावेळी ग्रामविकासमंत्री गिरीश महाजन यांची गाडी अडवत भाजपा विरोधी प्रचंड घोषणाबाजी केली. याचे पडसाद प्रदेशासह राष्ट्रीय स्तरावरील भाजपात उमटले आहेत. दबावतंत्राला न झुगारण्याची रणनीति या पक्षाने आखल्याची माहिती समोर आली आहे.**

गेल्या काही वर्षात काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेसमधील नेते साखर कारखाने, सहकारी संस्था, कंपन्या आदींमधील गैर व्यवहारांच्या केंद्रीय तपास यंत्रणा किंवा राज्य सरकारने सुरू केलेल्या चौकशा थांबविण्यासाठी भाजपमध्ये प्रवेश केला आहे. भाजपनेही राज्यातील प्रतिष्ठित राजकीय घराणी आपल्याबरोबर असल्यास पक्षाची ताकद वाढेल, या हेतूने त्यांना प्रवेश दिले. आता मात्र या राजकीय घराण्यांकडून भाजपवर उमेदवारी व अन्य मागण्यांसाठी दबाव वाढत असून माढ्यातील असंतोष हे त्याचे एक उदाहरण आहे.

विरोधकांशी हातमिळवणी करण्याची भीती दाखवून भाजपकडून हवे ते पदरात पाडून घेण्याचे प्रयत्न यशस्वी झाल्यास काँग्रेस- राष्ट्रवादी काँग्रेसमधून भाजपमध्ये आणि उद्धव ठाकरे गटातून शिवसेनेत आलेले अन्य नेतेही लोकसभा आणि आगामी विधानसभा निवडणुकीत राजकीय दबावतंत्र वापरतील, अशी भीती प्रदेश भाजप नेत्यांना वाटत आहे. त्याचबरोबर जाहिर केलेली उमेदवारी काढून घेतल्यास नाईक-निंबाळकर हे नाराज होतील आणि धैर्यशील यांना उमेदवारी दिल्यास त्यांना निवडणुकीत विजयासाठी मदत करणार नाहीत. भाजपने काही संस्थांकडून केलेल्या सर्वेक्षणात नाईक-निंबाळकर यांच्या विजयाची शक्यता अधिक असल्याचे दिसून आले आहे. त्यांची खासदारकीच्या काळातील कामगिरी व अन्य बाबी विचारात घेता केवळ मोहिते-पाटील यांचा विरोध हे उमेदवारी रद्द करण्याचे कारण ठरू शकत नाही. त्यामुळे मोहिते-पाटील गटाने विरोध केला तरी नाईक-निंबाळकर विजयी होतील, असे भाजप नेत्यांना वाटत आहे. त्यामुळे यासंदर्भात फडणवीस हे विजयसिंह व धैर्यशील मोहिते-पाटील यांची समजूत घालण्यासाठी चर्चा करण्याची शक्यता आहे.

# राजाभाऊ सरवदे यांच्यासाठी आठवले मैदानात!

## उमेदवारी देण्याचे फडणवीस यांचे आश्वासन असल्याची माहिती!!



**लोकसभेच्या सोलापूर राखीव मतदारसंघातील भारतीय जनता पक्षाच्या उमेदवारीचा तिढा सुटत नसतानाच रिपब्लिकन पक्षाचे केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी सोलापूरच्या जागेवर पुन्हा एकदा दावा केला. सांगलीत पत्रकारांशी बोलताना त्यांनी सोलपुरातून राजाभाऊ सरवदे हे निवडणूक लढतील. सोलपुरातून सरवदे आणि शिर्डीतून माझ्या उमेदवारीसाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस प्रयतनशील आहेत, असेही त्यांनी स्पष्ट केले. रिपब्लिकन पार्टी ऑफ इडियाला पक्ष म्हणून मान्यता मिळवण्यासाठी दोन खासदारांची आवश्यकता आहे. यासाठी आम्ही शिर्डी व सोलापूरच्या जागेचा आग्रह धरला असून भाजपने नवे मित्र मिळाल्यावर जुन्या मित्रांना विसरु नये असा टोलाही आठवले यांनी लगावला.**



आठवले म्हणाले, शिर्डी मधून आपण स्वतः आणि सोलापूर मधून राजा सरवदे हे लोकसभा निवडणुकीसाठी इच्छुक असून आरपीआयला जागा न मिळाल्यास मोठी नाराजी पसरण्याची शक्यता आहे, जागा मिळणे हा आमचा हक्क आहे, जनता आम्हाला विचारत आहे. आम्हाला दोन जागा मिळाव्यात यासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस प्रयत्नशील आहेत.

वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर जरी राहुल गांधींच्या न्याय जोडो यात्रेच्या समारोपाला हजर राहिले असले, तरी महाविकास आघाडी मध्ये सहभागी होतील असे वाटत नाही आणि महाविकास आघाडी त्यांना घेणार ही नाही,तसेच प्रकाश आंबेडकर जर मोदींच्या विरोधात असतील तर मी मोदींच्या बाजूने भक्कमपणे उभा आहे. कर्नाटकमधील भाजपा खासदार अनंत हेगडे यांनी संविधानाबाबत केलेल्या वादग्रस्त वक्तव्याचा मंत्री आठवले यांनी निषेध केला. संविधान कोणीही बदलू शकत नाही, मात्र हेगडे यांचे विधान निषेधार्थ असून त्यांच्यावर कारवाईची मागणी भाजपाकडे करणार असल्याचे त्यांनी सांगितले. मध्यंतरी, सरवदे यांनी सोलापुरात रामदास आठवले यांच्या उपस्थितीत मेळावा गेतला होता. त्यांच्या मेळाव्याची उपस्थिती पाहता त्यांनी लोकसभा निवडणुकीची तयारी सुरू केल्याचे मानण्यात येत आहे. मात्र, युतीच्या जागावाटपाचा तिढा अद्याप सुटला नाही. या जागावाटपाच्या चर्चेला आठवले किंवा त्यांच्या प्रतिनिधीला अद्याप निमंत्रण नाही. त्यामुळे जागांच्या साठमारीत रिपब्लीकन पक्षाला जागा सोडणार का? याबाबत साशंकता व्यक्त होत आहे. सध्या अनेक पातळीवर घटनेवर हल्ला होत असल्याची टीका विरोधी पक्षाकडून सातत्याने करण्यात येत आहे तरीही आठवले गट हा नेहमी भारतीय जनता पक्षा सोबत कायम राहिला आहे. या त्यागाचे आणि मैत्री निभवण्याची किंमत म्हणुन आम्हाला या दोन जागा हव्यातच असा आग्रह फडणवीस यांच्याकडे आठवले यांनी धरला आहे.